# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०१८/2742

दिनांक :- 26 NOV 2018

प्रति,

प्राचार्य,

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- MahaDBT पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज विभागीय कार्यालयाकडे त्वरीत पाठविण्याबात.**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता विविध योजनेकरीता शासनाचे **MahaDBT पोर्टलवर** आपल्या संस्थेतील प्रवेशित ज्या पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत व या कार्यालयाव्दारे Approved केलेले आहेत अश्या विद्यार्थ्यांना त्यांना देय असलेली रक्कम शासनाव्दारे थेट विद्यार्थ्यांचे खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे व विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे सुध्दा जमा होत आहे.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपणास विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज या कार्यालयाकडे Approved करण्याचे दृष्टीने वारंवार या कार्यालयाव्दारे कळविलेले आहे. तथापी आपल्या Login मध्ये संस्थेतील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या स्तरावर Pending असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भविष्यात असे विद्यार्थी आर्थिक लाभापासून वंचित राहील्यास सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील, व अश्या विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या **Login** मध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांचे आलेले अर्ज त्वरीत या विभागीय कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावे. व ज्या विद्यार्थ्यांनी अजुनपर्यंत अर्ज आपल्या **Login** मध्ये पाठविलेले नाहीत अश्या विद्यार्थ्यांना असणा-या त्रृटीचे निरसन करुन त्यांना अर्ज पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्याबाबत आपल्या स्तरावरुन मदत करावी.

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**

सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

**प्रत :-** १. प्रत :- मा.संचालक, (कार्यासन क्रमांक १८) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सादर.

२.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.